# पतसंस्थांचे उपविधी वाचन - मनन - अंमलबजावणी

सर्वच समस्यांवर एकच रामबाण उपाय म्हणजे वाचन-मनन होय. परंतु सहकारात शेकडो करोड रूपयांच्या खेळते भांडवल असणाऱ्या सहकारी संस्थांमधील पदाधिकारी संचालक - अधिकारी व कर्मचारी आपापल्या संस्थेचे शासन मान्य 'उपविधी' वाचत नाहीत ही बाब निराशजनक आहे. आणि त्यात पतसंस्थांचे संचालक व कर्मचारी ह्याला अपवाद होवू शकत नाही. आणि हे विदारक सत्य आहे.

उपविधीच केव्हा वाचायचा नाही, ही बाब सर्वांनाच शुल्लक व किरकोळ वाटते व उपविधीच्या अनुषंगाने सहकार कायदा वाचून समजून घेणे आणखी दुरापास्त बाब आहे. कोणी म्हटले तरी किरकोळ अपवाद वगळता हे काम करण्यास कोणाची मानसिकता नाही, आवड नाही, वेळ नाही, गरज नाही किंबहुना माहितीच नाही, उपविधी वाचून-मनन केले नाही व समजून घेतला नाही तर ह्यामुळे काय अडले आहे, असे अनेकजण मोठ्या संख्येने प्रतिक्रिया व्यक्त करतात, परंतु अशा प्रतिक्रिया अज्ञान, दांभिकपणा, निष्काळजीपणा व विश्वस्तांची भूमिका 'रामभरोसे' तत्त्वावर सांभाळण्याचा प्रकार आहे. आणि हेच संपुर्ण महाराष्ट्र राज्यात ह्या क्षणापर्यंत घडले आहे.

पतसंस्थेच्या नावात व पत्त्यात बदल ह्या प्रथम तरतुदींची सुध्दा 'उपविधीत' रितसर दुरूस्ती करून घ्यावी लागते. हे सुध्दा माहित नसावे, हे कसले लक्षण आहे? व्याजाचे दर उपविधी डावलून लावले जातात, हे कसले द्योतक आहे? संचालक मंडळाची मासिक सभा, विशेष सर्वसाधारण सभा, वार्षिक सर्वसाधारण सभा, कार्यक्षेत्र, सभासदत्व, राजीनामा, अपात्रता इत्यादी अत्यंत मूलभूत नियम उपविधीत असताना देखील वाचन न केल्यामुळे अनेक संकटे ओढून घेतली जातात व त्याचा शेवट ''आर्थिक संकटे'' आ वासून उभी राहतात. कर्जवाटप निकष, कागदपत्रे व कर्ज वसुलीची उपविधीतील तरतुदी वाचलीच नसल्यामुळे संस्थेवर प्रशासक, अवसायक नेमण्यापर्यंत ते संचालकांवर पोलिस केसेस दाखल करून जेलमध्ये जाण्याची उदाहरणे ह्या राज्यात कमी नाही. कारण ह्याचे मूळ ''उपविधीचे वाचन-मनन न करणे हेच होय'' हे सांगितले तर पटणारच नाही. परंतु दुर्दैवाने हे खरे आहे. कोणी मानो किंवा न मानो, पतसंस्थांचे उपविधी वाचलेच पाहिजे व मनन करून समजून घेतले पाहिजे व त्याची त्याप्रमाणेच अंमलबजावणी करायला पाहिजे.

उपविधी वाचण्यास किती वेळ लागतो? जास्तीत जास्त केवळ ४ तास. मग आपल्याला हा वेळ मिळतच नाही? हे कसे शक्य आहे? त्याचे परिणाम व दुष्परिणामाचे मुळ शोधले तर त्याचे हेच उत्तर सापडेल. वाईट एवढ्याचेच वाटते की, करावे कोणी आणि भरावे कोणी? अतिशहाणे ह्याच गोष्टीचा गैरफायदा घेतात व निष्पाप संचालकांना अडचणीत आणतात व शेवट एखाद्याचे वैयक्तिक आयुष्य देखील बेचिराख होते. हजारो उदाहरणे अनेकांना माहित आहेत.

सहकार खात्याचे काही महाभाग तर ह्याच गोष्टीचा गैरफायदा घेऊन ह्या राज्यात सहकाराच्या नावाखाली ारदिवसा राजरोसपणे सहकारी संस्थांवर दरोडा नियमितपणे टाकीत आहेत. **चुक झाली तरी पैसे व चुक दुरूस्त करण्यासाठीही पैसे आणि पुन्हा ''साव'' म्हणून मिरवायला तयार असतात.** दारू-मटक्याच्या धंद्यासारखे सहकारात हप्त्यांची वसुली करतात, पती-पत्नी, मुलगा-मुलगी, जावई, मेव्हणा, आई-वडील ह्यांच्या नावे लाखो-करोडो रूपयांची स्थावर-अस्थावर मालमत्ता इंकम टॅक्सच्या पध्दतशीर फाईल्स बनवून, रिटर्नस भरून न्याय देवतेला व देशाच्या अर्थव्यवस्थेला खुल्लम-खुल्ला आव्हान करतात. एक पगारी कर्मचारी एवढी मालमत्ता कशी काय जमवतो ? आणि तो ही सरकारी ? कोणाला हे माहित नाही ? पण करणार काय ? प्रत्येकाचा स्वार्थ आडवा येतो. असे म्हणतात की, 'प्रत्येक जण काचेच्या घरात राहतो' हे काय उत्तर होऊ शकते ? परंतु सहकार खात्यात असेही कर्मचारी आम्ही पाहिले आहेत, की पगाराच्या व्यतिरिक्त सहकारी संस्थांकडून किंवा दुसऱ्या कुठल्याही माध्यमातून पैसे खाण्याचे पाप बिलकुल करीत नाहीत. किंबहुना ह्या कर्मास ते जन्मदात्या आई-वडीलांशी प्रतारणा समजतात. म्हणूनच आमचा ह्या व्यवस्थेवर अजुनही विश्वास आहे.

परंतु एवढ्याने हा प्रश्न सुटत नाही. उपविधी वाचलाच पाहिजे. व आपले भविष्य स्वत:च सुरक्षित बनविले पाहिजे. एकंदरीत वाचनाच्या अभावामुळे सर्व अनर्थ होत असतात. हे कोण अमान्य करील ? न वाचल्यामुळे मोठे मासे छोट्या माशाला सतत गिळंकृत करीत आहेत. हे सर्व स्तरावर आहे. मग कोणीतरी हे राबविले पाहिजे व चळवळ म्हणून ह्याकडे पाहिलेच पाहिजे. उपविधी वाचा बघा क्रांती होते किंवा नाही ? जबरदस्त सुपरिणाम दिसतील. त्याचे आर्थिक फायदे सर्वांना मिळतील. दुरितांचे तिमीर जाण्यासाठी हे करावेच लागणार आहे.

आमचा हा अट्टाहास आहे. आम्हांला कोणी फसविलेले चालत नाही, लुटलेले चालत नाही, भिती दाखविलेली चालत नाही, परिणामाला घाबरण्याची भूमिका चालत नाही, म्हणून आम्ही प्रत्येक गोष्ट स्वत: वाचतो, समजून घेतो व त्याची अंमलबजावणी न डगमगता करतो. परिणामाची पर्वा कशासाठी ? सहकारी संस्था काय मालकी हक्काची मालमत्ता थोडीच आहे ? म्हणून ह्या विचारामुळे असे संधीसाधू नजरेला नजर सुध्दा भिडवत नाही. लपून व भ्याडपणे वागत असतात. पण यश हे मिळतेच. परंतु वेळ लागतो.

परंतु हे हळूहळू सर्वांनी करावयास पाहिजे अशी आमची आग्रही भुमिका आहे. आणि म्हणूनच महाराष्ट्र राज्यातील ८७ वर्षांची वैभवशाली परंपरा असलेली, शिक्षण-प्रशिक्षण व प्रचार-प्रसार तसेच संशोधनाचे काम करणाऱ्या '**महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे**' ह्यांनी ''**उपविधी वाचन कार्यशाळा**'' **संपुर्ण राज्यात १ सप्टेंबर २००५ पासून** सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांसाठी कार्यक्रमास सुरूवात करीत आहे. कितीही कष्ट घ्यावे लागले, अडचणी आल्या तरी उपविधी वाचन-मनन-अंमलबजावनी ची जादू महाराष्ट्र राज्य सहकारी संघ आपल्या जिल्हा सहकारी मंडळाच्या माध्यमातून निश्चितपणे राबविणार आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचा अध्यक्ष म्हणून

ही संकल्पना राबविण्यासाठी आंम्हाला जे व्यासपीठ मिळाले, त्याची ही परतफेड ह्या कामाने होत आहे. ह्यात आंम्हास अभिमान वाटतो व धन्यताही वाटते.

म्हणून आपण ह्या पुण्यकर्मात जरूर सहभागी व्हा. उपविधी वाचा–मनन करा व अंमलबजावणी करून विश्वस्ताची भूमिका चोख बजवा.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**